महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १३ वे ■ अंक क्र. – १५ ■ गुरूवार, दि. १६ जुलै २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

* उत्सुकता *




## पुण्यात एफडीएच्या छाप्यात २ कोटी रुपयांचे बनावट दूध जप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पुण्यात पोलीस आणि एफडीएने शॅम्पू आणि रसायनांपासून बनावट दूध बनवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला असून, २ कोटी रुपयांचा माल जप्त केला आहे.महाराष्ट्रातील पुणे जिल्हा आणि आसपासच्या परिसरातील जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या एका अत्यंत धोकादायक आणि किळसवाण्या आंतरजिल्हा रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. पुणे ग्रामीण पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाच्या संयुक्त पथकाने एका मोठ्या छाप्यात, शॅम्पू, मिल्क पावडर आणि धोकादायक रसायनांच्या साहाय्याने तयार केल्या जाणाऱ्या कृत्रिम दुधाच्या काळ्या धंद्याचा पर्दाफाश केला आहे.या देशव्यापी नेटवर्कविरोधात मोठ्या कारवाईत आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली असून, २ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे भेसळयुक्त साहित्य आणि उपकरणे जप्त करण्यात आली आहेत.

पोलीस आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या संपूर्ण टोळीचे मुख्य केंद्र पुणे जिल्ह्यातील मंचर परिसर होते. या रॅकेटची मुळे इतर अनेक जिल्ह्यांमध्ये पसरली होती, त्यामुळे पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या ३० सदस्यीय विशेष पथकाने आणि २० हून अधिक एफडीए अधिकाऱ्यांनी मंचर, अकलुज, अहिल्यानगर, सिल्लोड आणि सांगली येथे एकाच वेळी छापे टाकले.तपासादरम्यान अधिकाऱ्यांना असे आढळून आले की, ही आंतरजिल्हा टोळी अनेक जिल्ह्यांच्या बाजारपेठांमध्ये दररोज हजारो लिटर प्राणघातक बनावट दुधाचा धूर्तपणे पुरवठा करत होती.

आरोपीने तपास अधिकाऱ्यांसमोर केलेले धक्कादायक खुलासे कोणालाही घाबरवण्यासाठी पुरेसे आहेत. बाजारात आणि ग्राहकांपर्यंत दूध पोहोचवण्यापूर्वी, आरोपी प्रत्येक १,००० लिटर खऱ्या दुधात रसायने आणि शॅम्पूपासून बनव-लेले अंदाजे ५०० लिटर कृत्रिम दूध मिसळत असे. दूध घट्ट आणि फेसदार बनवण्यासाठी धोकादायक डिटर्जंट, निकृष्ट दर्जाची मिल्क पावडर आणि व्हे पावडरचा वापर केला जात असे.

या कारवाईदरम्यान, सोलापूरमधील सांगोला येथून येणारा एक टँकर अडवण्यात आला आणि त्यातून २८,४९८ लिटर भेसळयुक्त दूध जप्त करण्यात आले. अहिल्यानगर येथील एका संकलन केंद्रातून आणखी २४,४९८ लिटर संशयित दूध जप्त करण्यात आले. हे दूध मानवी आरोग्यासाठी विषारी आणि नाशवंत असल्याने, अधिकाऱ्यांनी संपूर्ण साठा घटनास्थळीच नष्ट केला. याशिवाय, चुकीचे लेबल लावल्याबद्दल आणि नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ९२,००० किलोग्रॅमपेक्षा जास्त खाद्यपदार्थही जप्त करण्यात आले.ही संपूर्ण संयुक्त कारवाई पुणे ग्रामीणचे पो-लीस अधीक्षक (एसपी) संदीप सिंग गिल आणि कार्यक्षम एफडीए आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या थेट देखरेखीखाली पार पडली. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या टोळीचे निधीपुरवठा करणारे दुवे आणि प्रमुख पुरवठादारांचा शोध घेतला जात आहे

## शेतकऱ्यांना दुहेरी भेट: कर्जमाफीनंतर ४८,००० कोटी रुपयांची वीज बिलेही माफ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दुहेरी भेट दिली आहे! २ लाख रुपयांचे कर्ज माफ केल्यानंतर, आता त्यांची ४८,००० कोटी रुपयांची थकबाकी अस-लेली वीज बिलेही पूर्णपणे माफ करण्यात आली आहेत.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना दुहेरी भेट दिली आहे. मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीतील ऐतिहासिक कर्जमाफीच्या निर्णयानंतर लगेचच, सरकारने शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची थकीत वीज बिलेही पूर्णपणे माफ केली आहेत. या निर्णयानंतर बुधव-ारी शेतकऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाला भाजप-चे अनेक नेते आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हेही उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, सरकारने शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचा सन्मान करण्यासाठी आयोजित केलेल्या एका सत्कार समारंभात, मुख्यमंत्र्यांनी वीज बिल माफीबाबतही एक महत्त्वपूर्ण घो-षणा केली.







श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

* शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून

B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.

प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




* वैशिष्टे *

* उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
* भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
* सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
* ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
* मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
* भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
* मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९

पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

* प्राचार्य :- मोबा. 9922172799






# वृद्धाश्रमाकडे वळालेल्या वाटा मदतीसाठी अखडलेले हात व लोप पावत चाललेली माणुसकी !

**दै. आवाज वृत्तसेवा...**

संस्काराची सुरुवात होते ती आपल्या घरापासून संस्काराच्या शिदोरी चे मूळ असतात आपले आजी आजोबा ,ज्या घरात अजूनही आजी आजोबा आहेत ते घर संस्कारी आहेत .पण आत्ताच्या काळात ९०% घरामध्ये आजी व आजोबा नावाचे मोती राहिलेले नाहीत .थेट वृद्धाश्रमाची वाट धरावी लागली त्यांना. ज्या आई-वडिलांनी आपल्या ला हे जग दाखवलं आपल्यासाठी दिवस रात्र कष्ट केले त्याच आई-वडिलांना आज वृद्धआश्रमात जावं लागतं . पूर्वी एकमेकात संवाद होता . मनोरंजनासाठी पुस्तके वाचली जात होती त्या पुस्तकांची जागा आता मोबाईलने घेतली आहे. या पुस्तकांमुळे मुले घडत होती त्या पुस्तकांची जागा मोबाईलने घेतल्यामुळे मुले बिघडत आहे.अरे !माणसा कुठे गेला तुझ्यातला माणूस



**साईली देवराम जाधव**
इयत्ता १२ वी कला अ
कर्मवीर विद्यालय विंचूर

आजचा समाज खूप बदलला आहे माणूस माणुसकी विसरत चाललाय तरुण मुले मोबाईलच्या व्यसनात अडकलेली आहेत माणसे एकमेकांचं ऐकायलाच तयार नाही मुले शाळेत जात आहे पण कोणत्या खाजगी शाळांमध्ये ज्याच्यात संस्कार व माणुसकी नावाच्या मौल्यवान गोष्टीला स्थान नाही ज्या शाळेतून संस्कार मिळत नसेल तर त्या शाळेतील विद्यार्थी कसा घडणार मुलांना व खास करून त्यांच्या आई-वडिलांना प्राथमिक जिल्हा परिषद शाळा नकोत आता समाजात स्त्रियांना अनेक त्रासांवर मात करावी लागत आहे त्यांच्या मदतीसाठी कुणीच का धावूनयेत नाही ज्या समाजात आपलेपणाच नाही ज्या समाजात भावनांचा आदर उरलेला नाही अरे ! कुठे नेऊन ठेवलाय माझा समाज ..... ज्या लोकांना मदत केल्याविना होत नसे ,ते एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होत होते .माणसा माणसात प्रेम ,आदर ,आपुलकी होती .जी माणसे स्त्रियांवर अन्याय, अत्याचार झाल्यावर लगेच आवाज उठवत होती कुणी स्त्रियांकडे वाकड्या नजरेने जरी बघितले तरी शिवरायांच्या काळात लोकांच्या अंगाला नुसता थरकाप सुटायचा ते लोक दुर्मीळ राहिलेत आता. पूर्वी शाळेच्या प्रांगणात प्रार्थना व्हायची गीतकार समीर सामंत यांची.... हीच आमुची प्रार्थना अन हेच आमचे मागणे माणसाने माणसाशी माणसासम वागणे ..............

ज्या मुलांच्या दिवसाची सुरुवात या ओळींनी होत होती. ती मुलं नोकरीला नाही लागली पण समाजात एक चांगला माणूस म्हणून घडली ते अजूनही माणुसकी विसरलेले नाही एखाद्या गरजवंताला मदत करा.

भुकेलेल्यांना भूक भागवण्यासाठी अन्नाची मदत करा .एखाद्या व्यक्तीने मदतीची विवांचना केली तर त्याला मदत करा .माणसांसाठी तर माणुसकीची मदत करणेच योग्य ठरेल.माणुसकीचे दान द्या कधी ना कधी हे केलेले दान मदत तुमच्या नक्कीच उपयोगी पडेल. 'कवी वि .दा .करंदीकर माणसांना मदत करण्यासाठी आपल्या कवितेच्या आ-ओळींतून खूप छान मार्गदर्शन करतात ' देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे घेणाऱ्याने घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे... ज्याच्यात दान करण्याचे ऐकत आहे त्याने दान करावे .ज्याला मदतीची भूक आहे त्याने घ्यावे व घेणाऱ्याने एक दिवस जो देतो त्याचे वर्तन आचरणात आणावे

समाजात अनेक मुली गायब होत आहे त्या कोणत्या कारणाने गायब होत आहे याचे मुळ का कुणास शोधावं वाटत नाही? अजूनही वेळ गेलेली नाही जी माणुसकी नावाची मौल्यवान वस्तू लोप पावत आहे ती एकमेकांत रुजवा व माणुसकी जपून ठेवा देशाच्या उज्वल भविष्याची मशाल तरुणांच्या हातात आहे ती प्रज्वलित करायची असेल तर तरुणाला राजहंसाची वृत्ती बाळगणं गरजेचं आहे राजहंस जसा दूध व पाणी एकत्र केल्यास दूध पितो व पाणी तसेच ठेवतो तसंच तरुणांनी पण चांगल्या गोष्टी घेतल्या पाहिजे व वाईट गोष्टी सोडून दिल्या पाहिजे व माणसातला माणूस व माणुसकी जागी करायला हवी कवयित्री बहिणाबाई चौधरी माणसाला उद्देशून म्हणतात...अरे माणसा माणसा कधी होशील तू माणूस तुझ्यापेक्षा ते गोठ्यातलं जनावर बर ...माणसाने माणसांसोबत माणसासारखेच वागले पाहिजे जनावरासारखे नाही असे कवयित्री सांगतात .माणसाने हिंसा, भ्रष्टाचाराचे मार्ग न धरता माणुसकीचा व प्रामाणिक पणाचा मार्ग अवलंबला पाहिजे.

# सोमठाणे जोश घाटात खाजगी लक्झरी बस उलटून चाळीसगाव तालुक्यातील मेहूणबारेचा एक युवक ठार, तर सहा प्रवाशी जखमी

**दै.आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे पळाशी प्रतिनिधी :- नाशिक जिल्ह्यातील येवला-नांदगाव राज्य महामार्गावरील राजापूर - सोमठाणे जोश घाटात काल सकाळच्या सुमारास एक भीषण अपघात झाला. प्रवाशांनी भरलेली एक खासगी लक्झरी बस उलटल्याने एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला आहे तर ५ ते ६ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने मदतकार्य सुरू केले. राजापूर सोमठाणे घाटात मध्यप्रदेश येथील लक्झरी बस बस काल सकाळी येत असताना, लक्झरी बस चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले, लक्झरी बस घाटात पलटी झाली. या बस मध्ये वीस - पंचवीस जण प्रवास करत होते. बस अचानक पलटी होताच, लक्झरी बसमधील प्रवाशी स्वतःचा जीव वाचविण्यासाठी धावपळ करीत मिळेल त्या मार्गाने धावपळ करीत होते. तर बस मधील मेहणबारे ता. चाळीसगाव येथील यश देविदास येवले या तरुणाचा लक्झरीबस बाहेर पडताना, बस खाली सापडल्याने मृत्यू झाला. हा तरुण नोकरीसाठी मुलाखत देण्यासाठी पुणे येथे गेला होता. घरी परतांना हा अपघात झाला. नियंत्रण सुटल्याने बस उलटली मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार ही खासगी लक्झरी बस मध्यप्रदेशातील होती. काल सकाळी सोमठाणे जोश घाटातून जात



असताना अचानक चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस उलटली. अपघाताच्यावेळी बसमध्ये सुमारे २० ते २५ प्रवासी प्रवास करत होते. बस उलटल्याने प्रवाशांमध्ये एकच गोंधळ आणि किंकाळ्या ऐकायला मिळाल्या. या भीषण अपघातात वेदांत उर्फ यश देविदास येवले रा. मेहुणबारे ता. चाळीसगाव या प्रवाशाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर ५ ते ६ प्रवासी जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी नांदगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. आहेत. हा अपघात एवढा भीषण होता की, लक्झरी बस थेट रस्त्याच्या मधोमध आडवी झाली. यामुळे येवला-नांदगाव रस्त्यावरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती. पोलीसांनी धाव घेत अपघातग्रस्त बस बाजुला करत दोन्ही बाजूंना वाहतूक कोंडी दूर केली,

कुटुंबावर दुःखाचा डोंगर

राजापूर - सोमठाणे जोश घाटात काल सकाळी खाजगी बस उलटून झालेल्या अपघातात ठार झालेला वेदांत येवले हा नुकतीच बीई टेक उत्तीर्ण झालेला होता. रविवारी तो पुणे येथे मुलाखतीसाठी गेला होता. सोमवारी त्याने एका कंपनीत मुलाखत दिली आणि सायंकाळी तो पुणे येथे राहत असलेल्या आपल्या चुलत बहिणीकडे गेला. तेथे जेवण घेतले. रात्री आईला फोन करून मुलाखत झाली, घरी येतो आहे असे सांगितले. हाच फोन शेवटचा ठरला, रात्री तो चाळीसगावकडे येणाऱ्या खाजगी बसमध्ये बसला. काल सकाळी वेदांतच्या आईने फोन केला असता ते उचलला नाही, म्हणून त्यांनी पतीला सांगितले. काही वेळाने पोलीसांचा फोन समोर आला. या घटनेने कुटुंबाला धक्का बसला. मेहुणबारे गावात या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे. एकुलता एक मुलगा अपघातात गेल्याने येवले कुटुंबियावर दुखाचा डोंगर कोसळला. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर कुटुंबाने तात्काळ नांदगावकडे धाव घेतली.

# नांदगावच्या कवयित्री प्रतिभा पवार खैरनार यांची कविता गुजरातच्या अभ्यासक्रमात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील कवयित्री प्रतिभा पवार-खैरनार यांची 'माय मराठी' ही कविता आता गुजरात राज्याच्या आठवीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या प्रेमावर आधारित या कवितेला मिळालेल्या या सन्मानामुळे नांदगाव परिसरात अभिमानाचे वातावरण आहे.

गुजरात शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (GSEB) वतीने प्रतिभा खैरनार यांच्या 'पडसावल्या' या काव्यसंग्रहातील माय मराठी या कवितेची निवड करण्यात आली आहे. गुजरात पाठ्यपुस्तक मंडळाने 'मराठी प्रथम भाषा' आणि 'द्वितीय भाषा' या दोन्ही विषयांच्या आठवीच्या पुस्तकात ही कविता समाविष्ट केली आहे.आतापर्यंत गुजरातच्या मराठी पाठ्यपुस्तकांमध्ये अनेक ज्येष्ठ कवींच्या कविता समाविष्ट झाल्या आहेत. आता त्याच यादीत नांदगावच्या ग्रामीण भागातील कवयित्री प्रतिभा खैरनार यांना स्थान मिळाले आहे. ही त्यांच्यासाठी आणि नांदगावसाठी मोठी अभिमानाची बाब आहे. पाठ्यपुस्तकात संत तुकाराम, प्र. के अत्रे, बाबा आमटे, त्र्यंबक बापूजी ठोंबरे, बहिणाबाई चौधरी, राजा मंगळवेढेकर जगदिश खेबुडकर, विठ्ठल उमप,उत्तम कोळगावकर यांच्यासह अनेक मान्यवर कविंच्या कवितेसोबत प्रतिभा पवार खैरनार यांच्या कवितेचा गौरव केला गेला आहे.

पुरस्कारप्राप्त कवयित्री

प्रतिभा पवार-खैरनार यांचे 'पडसावल्या', 'बाभूळफूल', 'प्राचीन वंशावळीच्या सरीतून' हे काव्य आणि कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या साहित्याला अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. त्यात मुख्यत्वे गदिमा साहित्य पुरस्कार,नामदेव ढसाळ काव्य पुरस्कार पुणे,यशवंतराव चव्हाण काव्य पुरस्कार पुणे, रेखा गुरव पुरस्कार कोल्हापूर,दक्षिण महाराष्ट्र सभेचा जनाबाई पुरस्कार कोल्हापूर यासह तीस पुरस्कारांनी त्या सन्मानित झाल्या आहेत.अनेक नामवंत समिक्षकांनी त्यांच्या संग्रहावर आपला अभिप्राय नोंदवला आहे.

मराठी भाषेची गोडी, तिची गोडवी आणि तिचे महत्त्व या कवितेतून मांडल्यामुळे विद्यार्थ्यांना मातृभाषेचे महत्त्व पटावे, हा या निवडीमागचा उद्देश आहे. या निवड समिती वरील सर्व पदाधिकारी आणि सुदेष्णा कदम मॅडम यांचे प्रतिभा मॅडमांनी आभार मानले आहे.

नांदगाव सारख्या ग्रामीण भागातील एका कवयित्रीच्या लेखणीला गुजरातमध्ये मान मिळाल्याने साहित्यिक आणि सामाजिक वर्तुळातून प्रतिभा खैरनार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पाठपुराव्याला यश : सोलापूर-मुंबई विमानसेवा २ ऑगस्टपासून पुन्हा सुरू

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सोलापूर, दि. १५: सोलापूर विमानतळावरून २८ जून पासून बंद असलेली सोलापूर ते मुंबई विमानसेवा स्टार एअरलाईन कंपनीकडून २ ऑगस्ट २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेनंतर कंपनीने हा निर्णय घेतला आहे.

२८ जून २०२६ पासून स्टार एअरलाईनची सोलापूर-मुंबई विमानसेवा तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आली होती. या मार्गावरील विमानसेवा बंद झाल्याने व्यापारी, उद्योजक, रुग्ण तसेच नोकरदार वर्गाची मोठी गैरसोय होत होती. सोलापूरकरांनी ही सेवा तात्काळ सुरू करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्टार एअरलाइन कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सोलापूर ते मुंबई विमानसेवा तात्काळ सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले होते. त्याचबरोबर मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही कंपनीला विमानसेवा सुरू करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. श्री. गोरे यांनी दिल्ली येथे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडेही याबाबत पाठपुरावा केला होता.

# मुखेड फाटा जऊळके जळगाव नेऊर मार्गे बस सुरू करण्याची मागणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपकढोकळे,पिंपळगावलेप:प्रतिनिधी येवला तालुक्यातील जऊळके या गावी प्रवाशांची गैरसोय होत असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच गावातील नागरिकांना इतर गावी जाण्यासाठी येवला आगाराकडून बसची सुरू होण्याची मागणी.राष्ट्रीय भ्रष्टाचार शक्ती विरोधी जनशक्ती अध्यक्ष नवनाथ आव्हाटे यांनी आगार व्यवस्थापक श्री प्रवीण हिरे यांना निवेदन देऊन बस फेरा सुरू करण्याची मागणी केली आहे. प्रामुख्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी सकाळी दहा वाजता व संध्याकाळी पाच वाजता फेरा देण्यात यावा.अशी ही मागणी यावेळी त्यांनी केली.याप्रसंगी आनंदा खैरनार,सौरव



खैरनार,पवन जाधव,ओंकार खैरनार, भावेश खैरनार, कार्तिक वाकळे, संकेत खैरनार, अनिकेत खैरनार, ऋषिकेश खैरनार, संपत खैरनार, आदित्य आव्हाड, राहुल खैरनार, नंदू वाकळे, नंदू पोळ, किशोर वाकळे, शुभम वाकळे,सचिन खैरनार, संदीप खैरनार, बाळासाहेब चंदनशिव, सचिन खैरनार, दीपक साठे. आदींच्या निवेदनावर सह्या निवेदनावर आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# खंडणीच्या गुन्ह्याचे अधिकार उप विभागीय पोलीस अधिकारी स्तरावर नेण्याची मागणी

## कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनकडून अधिकाराचा गैरवापर

**दै.आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:- कोपरगाव तालुक्यात गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू तस्करी विरोधात आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्ता विरोधात तालुका पोलीस स्टेशन कडून वारंवार खंडणीचे गुन्हे दाखल होत असल्याने गुन्ह्यांचे अधिकार उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर नेण्याची मागणी पुढे येत आहे.

कोपरगाव तालुक्यातील कोळगाव थडी सांगवी भुसार सुरेगाव कुंभारी धारणगाव गोदावरी नदीपात्रातून चालू असलेल्या अवैध वाळू तस्करी चे वार्तांकन सीसीटीव्ही फुटेज व तक्रारी महसूल वनविभाग पोलीस प्रशासनाच्या च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कोळगाव थडी येथिल पत्रकार सामाजिक कार्यकर्ते मतीन शेख पाठवत असल्याच्या रागातून कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन ने वाळू तस्करी करणाऱ्या या अगोदर वाळू चोरीचे दोन गुन्हे दाखल असलेल्या फिर्यादी ला शेतकरी दाखवून शेख यांचेवर दाखल करण्यात आलेल्या खंडणी सारख्या गुन्हात दुसरा बळी जाऊ नये म्हणून सदर गुन्हा चे अधिकार उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर नेण्यासाठी विधिमंडळात कायदा पास होण्यासाठी पत्रकार संघ आवाज उठवणार आहेत. कोपरगाव तालुक्यात मटका गुटखा बिंगो लॉटरी खेड्यापाड्यात घरपोच दारु पुरवठा शासकीय तांदूळ विल्हेवाट सह अवैध वाळू तस्करी करणार्या संघटित टोळ्या तयार झाल्या असून या टोळ्यांनी तहसीलदार पोलीस महसूल कर्मचारी यांना एसीबी ट्रप मध्ये अडकावुन अवैध धंदा ची पाळेमुळे घट्ट रोवली आहे. तालुका पोलीस स्टेशन ला अवैध धंद्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक माया जमा होत असल्याने अनेक पोलीस अधिकारी तालुका पोलीस स्टेशनला बदलून येण्यास इच्छुक असतात. अवैध धंद्या वाल्यांचा पोलीस स्टेशनला कायमच राबता असल्याने कुठल्या पॉईंटला किती ट्रॅक्टर फरांड्या अवजड वाहने चालु होण्या अगोदर हप्त्याची रक्कम तालुका पोलीस ठाण्यातील दादाला पोहोच केली जाते अवैध धंद्यांच्या बातम्या समाज माध्यमातुन प्रसिद्ध झाल्यास वरिष्ठ कार्यालयास थातूर मातूर कारवाई चा फार्स दाखवला जातो. बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार यांना या संघटित टोळ्या वेगवेगळ्या मार्गाने त्रास देण्यास सुरुवात करून ट्रॉसिटी खंडणी विनयभंग यासारख्या खोट्या गुन्हात अडकवण्यासाठी सामुहिक पैसे गोळा करून वरिष्ठांना दिले जातात मतीन शेख यांच्यावर दाखल झालेला खंडणीचा गुन्हा पुन्हा एखाद्या वर न होण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर नेण्याची गरज निर्माण झाली आहे.

# हतगड ग्रुप ग्रामपंचायत येथे एसआयआर फार्म भरून घेण्यास मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद



लक्ष्मण पवार, हतगड.

सुरगाणा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत हतगड येथे SIR २०२६ नागरिक मार्गदर्शिका BLO फार्म वितरित केले ..मतदार यादीतील माहिती पडताळण्याची मदत केली अर्ज अचूक भरून एक प्रत BLO कडे जमा करतात व दुसरी प्रत मतदारकडे घेऊन सुरक्षित ठेवा.असे सांगतात लोकशाही बळकट, पारदर्शक आणि विस्वासार्ह करण्याच्या उद्देशाने सुरु असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुननिरीक्षण (SIR) अभियान अंतर्गत पडताळणी फार्म भरून घेतला जात आहे. मतदार सोबत दोन फोटो, आधार कार्ड, मतदान कार्ड, शाळेचा दाखला, जन्माचा दाखला घेऊन व आई वडिलांची नावाची माहिती करून योग्य रीतीने देऊन व मतदाराने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला आणि .मतदार यादीतील आपली माहिती अचूक असल्याची खात्री करण्यासाठी SIR पडताळणी फार्म भरून देण्यास . प्रकाश पवार, पवार सर BLO, सरपंच देविदास दळवी, ग्रामसेवक के. के. पवार, प्रकाश बागुल हरिष गायकवाड, रामदास गायकवाड, पांडुरंग पवार,यांनी मदतकार्य केले .व सर्व मतदारांनी फार्म भरून घेणेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# सुरेगावात श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात दुर्गंधीच्या विळख्यात शिजवला जातो शालेय पोषण आहार, विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी :- कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारा शालेय पोषण आहार दुर्गंधीच्या विळाख्यात शिजवला जात असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शालेय पोषण आहार शिजवताना दिलेल्या मापदंडाचे निकश डालवुन दुर्गंधीच्या विळाख्यात शालेय पोषण आहार शिजवला जात असून विद्यार्थ्यांचा आरोग्याचा जटिल प्रश्न निर्माण झाला असुन मुख्याध्यापकांचे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे पालकांचे म्हणणे आहे रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालयात सहावी ते आठवी च्या विद्यार्थ्यांना शालेय



पोषण आहार स्वच्छ वातावरणात शिजून वाटप करण्याची जबाबदारी देण्यात आली असतांना संबंधित गटाच्या वतीने स्वच्छतेची कुठलीही काळजी घेतली जात नाही शाळेच्या पाठीमागे असलेल्या एका शेड मध्ये पोषण आहार शिजवला जातो पोषण आहार वाटपानंतर उरलेला भात भाजी खरकाटे शेजारील ओसाड विहीरीच्या पाण्यात टाकण्यात येत असल्याने पाण्यावर लाल तेलकट पसरुन त्या ठिकाणी सडका कुजलेल्या वासाची दुर्गंधी पसरली आहे त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या टाक्या आहेत त्या ठिकाणी विद्यालयात जमा होणारा काडी कचरा फेकण्यात येतो त्यापासून काही अंतरावरच सफाई नसलेले अस्वच्छ मुतारी व शौचालय आहे शेजारीच

उरलेले अन्न उघड्यावर टाकण्यात येत असल्याने पोषण आहार शिजविणे शेड परिसर दुर्गंधीच्या विळाख्यात सापडल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आरोग्य खात्याने स्वच्छतेच्या केलेल्या शिफारशी विद्यालयात पाळल्या जात नाही हे तितकेच खरे.

# भावली धरण परिसरात पर्यटक कुटुंबावर जीवघेणा हल्ला; लुटमार करणाऱ्या टोळीतील ९ जण अटकेत

**दै.आवाज**...शिरवाडे वाकद :- इगतपुरी तालुक्यातील भावली धरण परिसरात फिरण्यासाठी आलेल्या नाशिकमधील एका पर्यटक कुटुंबावर जीवघेणा हल्ला करून लुटमार करणाऱ्या टोळीतील नऊ जणांना नाशिक ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेले टाटा योध्दा पिकअप वाहनही जप्त करण्यात आले असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास नाशिक शहरातील एक कुटुंब भावली धरण परिसरातील धबधबा पाहण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या दोन तरुणांनी कुटुंबातील महिलेकडे पाहून शिट्टी वाजवली. महिलेच्या पतीने त्यांना जाब विचारताच संबंधित तरुणांनी इतर साथीदारांना बोलावून त्यांच्याशी धक्काबुक्की व दमदाटी केली. घटनेनंतर संबंधित कुटुंब कारने नाशिकच्या दिशेने निघाले असता आरोपींनी त्यांच्या कारचा पाठलाग केला. कार अडवून बांबूच्या काठ्या, बेसबॉल स्टिक व लोखंडी रॉडच्या साहाय्याने



कारच्या काचा फोडून नुकसान केले. तसेच कुटुंबातील सदस्यांना मारहाण करून फिर्यादीच्या पतीच्या गळ्यातील सोन्याची साखळी हिसकावून घेतली, साक्षीदाराचा मोबाईल फोन लुटला आणि कुटुंबावर जीवघेणा हल्ला केला. या प्रकरणी इगतपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १६६/२०२६ दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व इगतपुरी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत इगतपुरी व सीमावर्ती भागातून नऊ संशयितांना ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान आरोपींनी इतर साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये विशाल मच्छींद्र भटाटे (२७, रा. गिरणारे), अनिकेत गणेश मानवेढे (२४, रा. गिरणारे), अनिरुद्ध विठोबा भेगडे (२५, रा. नांदगाव सदो), सागर उर्फ लोकेश गोकुळ गीते (२२, रा. माणिकखांब), विनोद लक्ष्मण बोराडे (२६, रा. इगतपुरी), सचिन दत्तू आडोळे (२९, रा. माणिकखांब), अर्जुन चिंधू आडोळे (२५, रा. माणिकखांब), देविदास कचरू भगत (२५, रा. बलैदुरी) आणि अजय भूषण दलभगत (२०, रा. देवळे-घोटी) यांचा समावेश आहे. पोलिसांनी गुन्ह्यात वापरण्यात आलेले टाटा योध्दा पिकअप (क्र.एम एच - ४६- सी एल- ३७३४) जप्त केले असून फरार आरोपी तसेच गुन्ह्यात वापरलेल्या इतर वाहनांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# पाऊस उघडल्याने शेतकरी चिंतेत; पिकांना उन्हाच्या झळा

**दै.आवाज वृत्तसेवा...**

दिपकढोकळे,पिंपळगावलेप:प्रतिनिधी येवला तालुक्यातील ग्रामीण भागात खरिप हंगामातील मका,सोयाबीन भुईमूग,बाजरी आदीं पिकांच्या पेरण्या शेतकऱ्यांनी मागील पंधरा दिवसांपूर्वी पुर्ण केल्या.मात्र सध्या पावसाने पाठ फिरविल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे.यापुर्वीअल्पशा प्रमाणात पावसाने हजेरी लावल्याने येथील शेतकरी सुखावला होता.परंतु पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी मका लागवडीसह इतर पिकांच्या लागवडींना वेग दिला होता.मात्र आता पाऊस नसल्याने शेतकऱ्यांनाकडून चिंता व्यक्त होत आहे.गेल्यावर्षी मृग नक्षत्रात पावसाने दमदार हजेरी लावल्याने खरीपातील पिके टवटवीत होती.परंतु यावर्षी पावसाने उघड दिल्याने पिकांना पुरेसं पाणी नसल्याने कोमजून जाण्याची वेळ शेतकऱ्यांवर आल्याचे दिसून येत आहे.

हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे आणि कडक उन्हामुळे नुकत्याच पेरण्या केलेल्या शेतकऱ्यांवर संकट ओढवल्याचे दिसून येत आहे.यंदाचा जून महिना कोरडा गेल्यावर जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या थोड्याफार पावसानंतर शेतकऱ्यांनी धोका लक्षात घेत खरीप पेरण्या केल्या होत्या.मात्र सध्याच्या स्थितीत पेरणीनंतर अचानक ढगाळ वातावरण नाहीसे होऊन कडक ऊन पडू लागले आहे.त्यामुळे जमिनीत पुरेशी ओल नसताना उगवून आलेली कोवळी पिके जळू लागली आहेत. परंतु येत्या २-३ दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास,आधी केलेली पेरणी वाया जाऊन शेतकऱ्यांवर 'दुबार पेरणी' करण्याची मोठी वेळ येऊ शकते.अशी चिंता शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.



# पिंपळगाव बसवंत टोलनाक्यावर ५३५ किलो गांजा जप्त; तब्बल १ कोटी १२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**दै. आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद : नाशिक ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधातील मोहिमेला मोठे यश मिळवत पिंपळगाव बसवंत टोलनाका परिसरात छापा टाकून ५३५ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत एका संशयिताला अटक करण्यात आली असून १ कोटी १२ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि.१४ जुलै २०२६ रोजी पिंपळगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना गुप्त माहिती मिळाली की, नाशिककडून मालेगावच्या दिशेने जाणाऱ्या एम.एच.०६ बी.जी.१७७६ या क्रमांकाच्या पिकअप वाहनातून गांजाची तस्करी केली जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पिंपळगाव टोलनाक्यावर सापळा रचून वाहनाची तपासणी केली. तपासणी दरम्यान वाहनातून ५३५ किलो गांजा आढळून आला. या प्रकरणी राहुल शांताराम पाटील, वय ३३, रा.मुटकी, ता.जि.धुळे याला ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी पिंपळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २०१/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा कलम ८(क) व २०(ब)(ळळ)(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ५३५ किलो गांजा, पिकअप वाहन, मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १,१२,१४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक (मालेगाव) व अपर पोलीस अधीक्षक (नाशिक ग्रामीण) यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध व्यवसाय व अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिस निरीक्षक गणेश गुरव, स.पो.नि.रोहिदास भोर, सहा पोलिस उपनिरीक्षक चारोसकर, अंमलदार प्रशांत उगले, पो.हवा शिंदे व निकम, पो.शिपाई विकास वाळुंज यांनी मोलाची भूमिका बजावली.

✻ पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या नेतृत्वाखाली सर्वात मोठी कारवाई

पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी नुकताच पिंपळगाव पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. त्यानंतर निरीक्षक गुरव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गुप्त माहितीच्या आधारे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पिंपळगाव टोलनाक्यावर सापळा रचत ही धडक कारवाई केली. कारवाईत कोटींचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. निफाड तालुक्यातील अंमली पदार्थांविरोधातील ही अलीकडच्या काळातील सर्वात मोठ्या कारवायांपैकी एक मानली जात असून, या कारवाईमुळे तस्करांचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# धारदार चाकूसह दहशत माजवणारा व अंतरराज्यीय मोबाईल चोर सलग दोन कारवायांत जेरबंद ; लासलगाव पोलिसांची दमदार कामगिरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद :- लासलगाव पोलीस ठाण्यात नुकतेच सहायक पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारलेल्या सागर कोते यांनी रुजू होताच गुन्हेगारांविरोधात धडाकेबाज कारवाईची सुरुवात केली आहे. अवघ्या दोन दिवसांत त्यांनी प्रथम धारदार चाकू घेऊन बाजारतळ परिसरात दहशत माजवणाऱ्या आरोपीला जेरबंद केले, तर त्यानंतर आठवडा बाजारातील गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरी करणाऱ्या अंतरराज्यीय चोरालाही अटक केली. सलग दोन कारवायांमुळे लासलगाव शहरात पोलिसांचा वाढता धाक आणि गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची चर्चा सुरू आहे.



दि.१३ जुलै रोजी बाजारतळ परिसरात आरोपी रिजवान उर्फ बॉक्सरभाई आयुब बागवान, रा.पिंजार गल्ली, लासलगाव याने मद्यधुंद अवस्थेत एका नागरिकास मारहाण करून सुमारे १० इंच लांबीचा धारदार चाकू हातात घेऊन परिसरात दहशत निर्माण केली. घटनेची माहिती मिळताच लासलगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

यापूर्वी दि.१२ जुलै रोजी लासलगावच्या आठवडा बाजारात गर्दीचा फायदा घेत नागरिकांचे मोबाईल चोरणाऱ्या सुरज सलिम सोलंकी, रा.आहिरखेड, जि.इंदौर, मध्यप्रदेश या अंतरराज्यीय आरोपीला पोलिसांनी रंगेहात पकडले. त्याच्याकडून चोरीचा सॅमसंग एस २५ अल्ट्रा मोबाईल जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करून न्यायालयीन कोठडी मिळविण्यात आली.

या दोन्ही कारवाया नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.डी.एस.स्वामी, अपर पोलीस अधीक्षक विमला एम.तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी के.के.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक पोलीस निरीक्षक सागर कोते यांच्या नेतृत्वाखाली लासलगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने केल्या.

✻ लासलगावात 'कोते पॅटर्न'ची चर्चा

पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांत सलग दोन धडक कारवाया करून सहायक पोलीस निरीक्षक सागर कोते यांनी गुन्हेगारांविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे कायदा मोडणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असल्याचा ठोस संदेश गेला असून नागरिकांकडून या कारवाईचे स्वागत केले जात आहे.

# जागतिक प्लास्टिक सर्जरी दिन : प्लास्टिक सर्जरी म्हणजे केवळ सौंदर्यवर्धन नव्हे, तर नवजीवन देणारे शास्त्र - डॉ. प्रणित मानकरे

**दै.आवाज वृत्तसेवा...**

नाशिक : १५ जुलै जागतिक प्लास्टिक सर्जरी दिन निमित्त अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे प्लास्टिक व पुनर्रचनात्मक (ठशलेपीीीलिींळींश) शस्त्रक्रियेबाबत जनजागृती करण्यात आली. अनेकांच्या मनात प्लास्टिक सर्जरी म्हणजे केवळ सौंदर्यवर्धक शस्त्रक्रिया अशी समजूत असली, तरी प्रत्यक्षात अपघातग्रस्त, भाजलेले रुग्ण, जन्मजात विकृती, हाताच्या गंभीर दुखापती, कर्करोगानंतरची पुनर्रचना, मधुमेहामुळे झालेल्या जखमा तसेच चेहरा व शरीरावरील गुंतागुंतीच्या जखमांवर उपचार करण्यात प्लास्टिक सर्जरीची महत्त्वपूर्ण भूमिका असते. यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे प्लास्टिक, पुनर्रचनात्मक व कॉस्मेटिक सर्जन डॉ. प्रणित मानकरे म्हणाले, प्लास्टिक सर्जरी म्हणजे केवळ



सौंदर्य वाढविण्याची शस्त्रक्रिया नाही. रुग्णाचे हरवलेले अवयवांचे कार्य पुन्हा पूर्ववत करणे, आत्मविश्वास वाढविणे आणि त्याला पुन्हा सामान्य आयुष्य जगण्यास सक्षम करणे हे या शास्त्राचे मुख्य उद्दिष्ट आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि मायक्रोसर्जरीमुळे आज अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे करता येत आहेत. ते पुढे म्हणाले की, रस्ते अपघात, औद्योगिक अपघात, भाजणे, हाताच्या दुखापती किंवा गंभीर जखमांमध्ये वेळेत प्लास्टिक सर्जनचा सल्ला घेतल्यास अपंगत्व टाळता येते आणि उपचारांचे परिणाम अधिक चांगले मिळतात. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ट्रॉमा रीकन्स्ट्रक्शन, बर्न मॅनेजमेंट, हँड सर्जरी, डायबेटिक फूट केअर, कर्करोगानंतरची पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया, स्कार रिव्हिजन तसेच विविध कॉस्मेटिक शस्त्रक्रिया अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अनुभवी तज्ज्ञांकडून केल्या जातात. जागतिक प्लास्टिक सर्जरी दिनानिमित्त नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या पुनर्रचनात्मक किंवा सौंदर्यवर्धक शस्त्रक्रियेसाठी केवळ पात्र आणि अनुभवी प्लास्टिक सर्जनचाच सल्ला घ्यावा, असे आवाहन अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे करण्यात आले.

# महाराष्ट्र दालनाच्या माध्यमातून राज्यातील वस्त्रोद्योगाला जागतिक स्तरावर चालना - निवासी आयुक्त श्वेता सिंघल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नवी दिल्ली, : येथील भारत मंडपम येथे भरवण्यात आलेल्या जागतिक वस्त्रोद्योग प्रदर्शनातील महाराष्ट्र दालनाच्या माध्यमातून राज्यातील वस्त्रोद्योग निर्यातीला देशपातळीवर आणि जागतिक स्तरावर निश्चितच मोठी चालना मिळेल, असा विश्वास महाराष्ट्र शासनाच्या येथील निवासी आयुक्त श्वेता सिंघल यांनी व्यक्त केला. या प्रदर्शनातील महाराष्ट्राच्या दालनाला खरेदीदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.प्रदर्शनातील महाराष्ट्र दालनाची पाहणी केल्यानंतर महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव श्वेता सिंघल म्हणाल्या महाराष्ट्राचे दालन अत्यंत आकर्षक पद्धतीने उभारण्यात आले असून राज्याच्या समृद्ध वस्त्रोद्योगाची ओळख प्रभावीपणे करून देण्यात आली आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग निर्यातीला देशपातळीवर आणि जागतिक स्तरावर निश्चितच मोठी चालना मिळेल.

# क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनकडून खरीप २०२६ साठी सहा अत्याधुनिक कृषी नवकल्पना सादर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई : भारतीय शेतीसमोरील हवामानातील अनिश्चितता, कीटक व रोगांचे बदलते स्वरूप आणि वाढत्या उत्पादकतेच्या गरजा लक्षात घेऊन क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेडने खरीप २०२६ हंगामासाठी सहा अत्याधुनिक कृषी उत्पादने सादर केली आहेत. नवोपक्रम हा शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतातील समस्यांवर उपाय देणारा, व्यावहारिक, सुलभ आणि परवडणारा असला पाहिजे. ही सहा तंत्रज्ञानं शेतकऱ्यांची उत्पादकता, नफा आणि दीर्घकालीन शाश्वतता वाढविण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहेत, असे कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अंकुर अग्रवाल यांनी सांगितले

भात पिकासाठी कंपनीने 'झेबेरिया' आणि 'मॅक्सेंट्रा' ही दोन अत्याधुनिक




बुरशीनाशके बाजारात आणली आहेत. ही उत्पादने बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण ठेवून अधिक निरोगी पीक, उत्तम धान्य गुणवत्ता आणि वाढीव उत्पादनास हातभार लावतात.

कापूस पिकासाठी स्मार्ट ट्रिपल ॲक्शन तंत्रज्ञानावर आधारित 'वाल्ट्रुवा' हे कीटकनाशक सादर करण्यात आले असून ते रसशोषक किडींवर जलद, व्यापक आणि दीर्घकाळ टिकणारे संरक्षण देते. तसेच कंपनीने GreenAg तंत्रज्ञानावर आधारित 'KGR-T' हे ऑर्गेनिक स्मार्ट न्यूट्रिशन सोल्यूशनही लाँच केले आहे. हे उत्पादन पोषण कार्यक्षमता वाढवून फुले, फळधारणा आणि पिकाची लवचिकता सुधारण्यास मदत करते.

क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनचे ब्रँड्स बिझनेस विभागाचे मुख्य व्यवसाय अधिकारी सोहित सत्यवली यांनी सांगितले की, विविध कृषी-हवामान क्षेत्रांतील व्यापक क्षेत्रीय पडताळणीनंतर विकसित करण्यात आलेली ही उत्पादने शेतकरी आणि चॅनल पार्टनर्सना अधिक सक्षम व सर्वसमावेशक उपाय उपलब्ध करून देतील. कंपनीने भारतीय शेतकऱ्यांना सक्षम करण्याची वचनबद्धता कायम असल्याचे स्पष्ट केले.

